वाचले :-

१ **महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र.एमसीओ-२०२४/प्र.क्र.३००/नवि-१४, दिनांक : २० सप्टेंबर २०२४**
२ **मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण यांचेकडील दि. ०४/१०/२०२४ रोजीचा आदेश**
३ **श्रीम.सुचिता पानसरे, प्रशासन अधिकारी, यांचा दि.०७/१०/२०२४ रोजीचा रुजू अहवाल.**
४ **मा. आयुक्तसो यांचा दि.११ ऑक्टोबर, २०२४ रोजीचा मान्य प्रस्ताव.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि/२/कावि/६५७/२०२४
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०२४

विषय :- श्रीम. सुचिता पानसरे, प्रशासन अधिकारी यांना रुजू करुन घेणेबाबत.

आदेश,

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, शासन आदेश क्र. एमसीओ-२०२४/प्र.क्र.३००/नवि-१४, दि. २० सप्टेंबर, २०२४ अन्वये श्रीम. सुचिता पानसरे, प्रशासन अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना सहा. आयुक्त पनवेल महानगरपालिका येथे प्रशासकीय कारणास्तव बदलीने पदस्थापना देण्यात आलेली होती. त्यानुसार त्यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिका सेवेतून दि. २० सप्टेंबर २०२४ रोजीचे आदेशान्वये कार्यमुक्त करण्यात आलेले आहे.

सदर बदली आदेशाविरुध्द महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण येथे दाखल अपिल क्र OA No.-१२१५/२०२४ मध्ये दिनाक : ०४/१०/२०२४ रोजी सुनावणी होवून बदली आदेशास अंतरिम स्थगिती (Interim stay) देण्यात आलेली असून प्रशासन अधिकारी, समाज विकास विभाग या पदावर कार्यरत राहण्याबाबत निर्देश देण्यात आलेले आहेत. या अंतरिम आदेशाच्या अनुषंगाने श्रीम. सुचिता पानसरे, प्रशासन अधिकारी हे दिनांक ०७/१०/२०२४ रोजी मनपा आस्थापनेवर रुजु झालेल्या आहेत.

सबब, मी आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८ प्रस्तुतच्या आदेशान्वये, श्रीम. सुचिता पानसरे, यांना "प्रशासन अधिकारी, समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड महानगरपालिका" या पदावर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण तसेच शासन आदेशाचे अधिन राहून रुजू करुन घेण्यात येत आहे. त्यांच्या आस्थापना विषयक बाबी समाज विकास विभागाकडेच राहतील.

तसेच प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने श्रीम. सुचिता पानसरे, यांच्याकडे प्रशासन अधिकारी, झो. नि. पू. विभागाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात येत आहे. सदर विभागाचा अतिरिक्त पदभार सोपविण्यात आल्याने त्यांनी त्यांचे मुळ आस्थापना विभागाचे कामकाज सांभाळून अतिरिक्त पदभाराचे कामकाज करावयाचे आहे.

**सही/-**
**(शेखर सिंह)**
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, संबंधित अधिकारी
प्रतिलिपी-

१. मा.अपर मुख्य सचिव (सेवा) सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
२. मा.उप सचिव (नवि-१४ नगरविकास विभाग, मंत्रालय मुंबई
३. सामान्य प्रशासन विभाग टे. क्र. १, ७, संगणक कक्ष (साप्रवि)
४. सर्व संबंधित विभाग

सहा. आयुक्त.(सा.प्र.वि) ११.१०.२४
पिंपरी चिंचवड महानगरपालिका